**प्रेसनोट** दिनांक :– ०९.०२.२०२२

**आरोपी लोकसेवक श्रीकांत कोंडबा मदीलवार, वय ५६ वर्षे, मंडळ अधिकारी, भांडेगाव व कन्हेरगावनाका, तहसिल कार्यालय, हिंगोली रा. प्लॉट क्रमांक ७१, आनंदनगर, हिंगोली यांनी २५,०००/–रू. च्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती २०,०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवुन पहिला हप्ता म्हणुन १०,०००/–रू. दि.०८.०२.२०२२ रोजी स्वत: स्विकारली.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.०८.०२.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे तक्रार दिली होती की, तक्रारदार यांचे ट्रॅक्टरवर रेती चोरीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी यातील लोकसेवक श्रीकांत कोंडबा मदीलवार, वय ५६ वर्षे, मंडळ अधिकारी, भांडेगाव व कन्हेरगावनाका, तहसिल कार्यालय, हिंगोली रा. प्लॉट क्रमांक ७१, आनंदनगर, हिंगोली हे २५,०००/–रू. च्या लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दि.०८.०२.२०२२ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी केली असता यातील आलोसे श्रीकांत कोंडबा मदीलवार, वय ५६ वर्षे, मंडळ अधिकारी, भांडेगाव व कन्हेरगावनाका, तहसिल कार्यालय, हिंगोली यांनी २५,०००/–रू. च्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती २०,०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवुन दि.०८.०२.२०२२ रोजी पहिला हप्ता म्हणुन १०,०००/–रू. सिटी क्लबचे, पाठीमागील मोकळी जागा, हिंगोली येथे स्विकारली आहे.

त्यावरून आलोसे श्रीकांत कोंडबा मदीलवार, वय ५६ वर्षे, मंडळ अधिकारी, भांडेगाव व कन्हेरगावनाका, तहसिल कार्यालय, हिंगोली रा. प्लॉट क्रमांक ७१, आनंदनगर, हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुरनं ६५/२०२२ कलम ७ ला.प्र.वि. सन १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच यापुर्वी आलोसे श्रीकांत कोंडबा मदीलवार यांचेवर पो.स्टे. सेनगाव गुरनं ३०२०/२०१२ कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) ला.प्र.वि. सन १९८८ अन्वये गुन्हा दाखल असुन, सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्री धरमसींग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली हिंगोली युनिट येथील श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली, सपोउपनि/युनुस सिध्दीक, पोह/विजय उपरे, पोना/महारूद्र कबाडे, पोना/ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोशि/राजाराम फुपाटे, पोशि/सुजित देशमुख, मपोना/योगीता आवचार, चापोना/हिम्मतराव सरनाईक ला.प्र.वि. हिंगोली यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली हे करीत आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा.

**श्री धरमसींग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, – ९९२३४१७०७६**
**श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक, हिंगोली – ९८२२२००९५९**
**टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२४५६–२२३०५५, संकेतस्थळ** www.acbmaharashtra.net